# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १५८ वा ❑ गुरूवार दि.०७ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


**विशेष लेख...**

## ढगफुटी म्हणजे काय? ढगफुटीच्या घटना का वाढत आहे?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

पाऊस पडण्याचे प्रमाण कमी अधिक होत असले तरी काही भागात ढगफुटीच्या घटना वाढत आहे.अतिवृष्टीच्या घटना, तसेच अतिवृष्टीच्या घटना, केवळ भारतातच नव्हे तर जगभरात वाढत आहेत. जरी भारतातील एकूण पावसाचे प्रमाण फारसे बदललेले नसले तरी, कमी कालावधीत पावसाचे प्रमाण वाढत आहे. याचा अर्थ असा की अधिक पावसाळी सरी येतात आणि पावसाळ्यातही, पावसाळ्यात दीर्घ कोरडे सरी येतात. या पॅटर्नवरून असे दिसून येते की हवामान बदलामुळे ढगफुटी देखील वाढत आहेत.ढगफुटीच्या वाढत्या घटनांमुळे मोठ्या प्रमाणावर जीवित व वित्तीय हानी होत आहे. उत्तरकाशी येथील ढगफुटीच्या घटनेने उत्तराखंडची पुनरावृत्ती झाली जी अतिशय विनाशकारी होती.

जून २०१३ मध्ये, उत्तर भारतातील उत्तराखंड राज्यात दुपारी ढगफुटीमुळे विनाशकारी पूर आणि भूस्खलन झाले, जे २००४ च्या त्सुनामीनंतर देशातील सर्वात वाईट नैसर्गिक आपत्ती ठरली.

ढगांना त्यांच्या मार्गात गरम हवा आणि पर्वत आवडत नाहीत. जर त्यांच्या मार्गात काही अडथळा आला तर ते फुटतात.भौगोलिक परिस्थिती आणि हवामान बदलामुळे हिमाचल प्रदेशात पावसाळ्यात अशा घटना वाढत आहेत. आजूबाजूला उंच पर्वत आणि गरम हवा ही याची प्रमुख कारणे आहेत. या भागात उभारण्यात आलेल्या जलविद्युत प्रकल्पांचाही परिणाम होत आहे. हिमाचलमध्ये दरवर्षी पावसाळ्यात ढग आर्द्रतेसह उत्तरेकडे सरकतात. म्हणूनच, हिमालय एक मोठा अडथळा म्हणून काम करतो. जेव्हा गरम हवेचा एक झुळूक अशा ढगांवर आदळतो तेव्हा ते फुटण्याची शक्यता वाढते. अशा घटना राज्यातील कुल्लू, शिमला, मंडी, किन्नौर आणि कांगडा जिल्ह्यांमध्ये सर्वाधिक घडत आहेत.

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यातील धराली येथे ढगफुटीमुळे खीर गंगा नदीला आलेल्या पुरात अनेक लोकांचा मृत्यू झाला आणि अनेक घरे आणि हॉटेल्स उद्ध्वस्त झाली.केवळ २० सेकंदात होत्याचे नव्हते झाले..पुराच्या लोंढ्यापुढे नागरिकांचे काहीएक चालले नाही. पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे इमारती वाहून गेल्या.

ढगफुटी ही मुसळधार पावसाची क्रिया आहे. तथापि, सर्वच अतिवृष्टीच्या घटना ढगफुटी नसतात. ढगफुटीची एक विशिष्ट व्याख्या आहे: सुमारे १० किमी १० किमी क्षेत्रात एका तासात १० सेमी किंवा त्याहून अधिक पाऊस पडणे ही ढगफुटीची घटना म्हणून वर्गीकृत केली जाते. या व्याख्येनुसार, त्याच क्षेत्रात अर्ध्या तासाच्या कालावधीत ५ सेमी पाऊस पडणे देखील ढगफुटीची घटना म्हणून वर्गीकृत केले जाईल.

ढगफुटीच्या घटनेत, एका ठिकाणी एका तासाच्या आत त्याच्या वार्षिक पावसाच्या सुमारे १०% पाऊस पडतो. सरासरी, भारतातील कोणत्याही ठिकाणी एका वर्षात सुमारे ११६ सेमी पाऊस पडण्याची अपेक्षा केली जाऊ शकते.

ढगफुटी होणे हे असामान्य नाही, विशेषतः पावसाळ्याच्या महिन्यांत. या घटना प्रामुख्याने हिमालयीन राज्यांमध्ये घडतात जिथे स्थानिक भूगोल, वारा प्रणाली आणि खालच्या आणि वरच्या वातावरणातील तापमान ग्रेडियंट अशा घटनांना अनुकूल असतात. तथापि, ढगफुटी म्हटल्या जाणाऱ्या प्रत्येक घटनेला प्रत्यक्षात ढगफुटी असे म्हटले जात नाही. कारण या घटना खूप स्थानिक असतात. त्या खूप लहान भागात घडतात जिथे बहुतेकदा पाऊस मोजण्याचे उपकरण नसतात.

हिमाचल, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि ईशान्य राज्यांसारख्या डोंगराळ भागात ढग फुटणे अधिक सामान्य आहे. वातावरणातील आर्द्रता आणि उष्णतेची पातळी शिगेला असताना ढग फुटणे होते. या घटना मैदानी भागात कमी आणि डोंगराळ भागात जास्त सामान्य आहेत. कारण येथील हवेचा प्रवाह खूपच अरुंद आहे.

हवामान बदल आणि भौगोलिक परिस्थितीच्या परिणामामुळे अशा घटना घडत आहेत. ढगांना मार्ग सापडत नाही किंवा अनेक ढग एकमेकांवर आदळतात तेव्हा देखील अशा घटना घडतात. ढगफुटीमुळे जीवितहानी व वित्तहानी मोठ्या प्रमाणावर होत आहे.

नुकसान टाळण्यासाठी, लोकांनी उतार असलेल्या कच्च्या जमिनीवर घरे बांधणे टाळावे. उतार असलेली जमीन मजबूत असेल तेव्हाच बांधकाम करावे. याशिवाय, नद्या आणि ओढ्यांपासून अंतर राखले पाहिजे.

## आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

# सशक्त सृजनशील नाट्यप्रयोग....ये रे ये रे पावसा..!

॥ नाट्यसमिक्षा ॥

कविराज, विजय यशवंत सातपुते, पुणे.

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

माझी मुक्तता ही देहाच्या बंधनातून नाही,
तर स्वरूपविस्मरणाच्या गूढतेतून आहे.
कारण मी आता त्याला परिभाषा देत नाही,
तर स्वतःची भाषा शोधतेय
जिथे प्रेम म्हणजे संमती नाही,
तर एक अनाम चैतन्य आहे.
जिथे स्त्री म्हणजे करुणा नाही,
तर शक्तीची मौन ज्वाला आहे.
आणि पुरुष?
तो आता माझ्या आत्म्याच्या कक्षा व्यापत नाही,
कारण त्या कक्षा मी स्वतः विस्तारते आहे.
आता मी मुक्त होते
तृप्त नव्हे, पण स्मरणगंधित मुक्त.
कारण माझी मुक्ति ही केवळ त्याच्यापासून नाही,
तर माझ्याच विस्मरणातून आहे...



या नी ..अशा विचारधारेवर आधारीत हे नाटक मनाला अतिशय भावले.

काल दिनांक ५/८/२०२५ रोजी एक अतिशय सकस, दर्जेदार नाट्यकला कृती पहायला मिळाली.

ओएमएस आर्टस् आणि रंगशाळा प्रस्तुत, एक भावस्पर्शी दीर्घांक पहाण्याचा योग आला. सतीश इंदापूरकर यांच्या कथेवर आधारीत हा नाट्यप्रयोग अतिशय आवडला.

दीपक पारखी, यांनी केलेले नाट्यरुपांतर अतिशय प्रभावी आणि वास्तवदर्शी ठरले.

डॉ. संतोष पोटे आणि डॉ. सुनीता पोटे यांनी प्रायोजित केलेले हे नाटक वैशिष्ट्यपूर्ण ठरले.

आई आणि मुलीच्या नात्याचा मैत्रीण होण्याचा प्रवास... ‘‘येरे येरे पावसा‘‘ या दीर्घांकातून पहायला मिळाला.

एक नाजूक, संवेदनशील विषय अतिशय समर्थपणे हाताळला गेला. आई आणि मुलीच्या नात्याविषयीच्या भाव भावनांचा ओथंबून येणं, ओसंडून वहाणं.. आकस्मिक भिजवणं.. आणि स्वच्छंदी पुणे भिजायला लावणं या अनुभूतींनी हा नाट्य शुभारंभ प्रयोग यशस्वी झाला.

‘‘येरे येरे पावसा‘‘

भक्ती आठवले,भक्ती आठवले /प्रीती वाईकर विप्रदास यांच्या सशक्त अभिनयाने कथानकातील प्रत्येक शब्दाला यथोचित न्याय मिळाला.

कल्पिता पावसकर हिचे नेपथ्य, अमोल काळे यांचे संगीत, गायत्री काटे हिचे रंगभूषा आणि शीला इंदापूरकर यांची वेशभूषा आणि शिवम यांचे संगीत नियोजन, अभिजीत मंगल यांची प्रकाश योजना आणि प्रिया प्रमोद दामले व सतीश इंदापूरकर यांचे अचूक दिग्दर्शन, सशक्त लेखन, आणि साभिनय संवाद सादरीकरण, नाट्यरसिकांची हाऊसफुल उपस्थिती.. आणि उत्स्फूर्त दाद.. या नाटकाच्या जमेच्या बाजू आहेत.

आई आणि मुलीच्या नात्याचा एक भावानुवाद या नाटकांद्वारे साकार झाला. एकुलती एक लेक... मैत्रीण होण्याचा प्रवास... आणि जीवनसंघर्षातून नवीन विचार रूजविणारा हा अनोखा नाट्यविष्कार अतिशय आवडला. भिजणं.. भिजवणं.... ओलावा.. ओल.. वहाणं.. बरसंण या शब्दांचे अर्थ उलगडून दाखवणारा हा नाट्यप्रयोग खूप आवडला.

महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात, ग्रामीण भागात यांचे अधिकाधीक प्रयोग होवोत या सदिच्छा...!

# टेरिफ बॉम्ब आणि भारताचा स्वदेशी ब्रह्मास्त्र...






**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

प्रेसिडेंट डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ धोरणाचे अंतरंग लक्षात घेतले असता असे दिसते की हे धोरण सातत्यपूर्ण नाही, त्यामध्ये नेहमीच गोंधळजनक परिस्थिती असते अंमलबजावणीची तारीख घोषित होते आणि ती पुन्हा पुढे ढकलली जाते त्यामुळे जगाच्या बाजारपेठेतील अस्थिरता वाढली आहे जगातील कुठल्या देशावर काय परिणाम होतील याची चर्चा करण्यात त्या त्या देशातील लोक दंग आहेत, पण खरे तर या मोहम्मद तुघलकी धरसोड धोरणाचा सर्वात मोठा फटका कोणाला बसला असेल तर तो अमेरिकेला, तेथील वाढती महागाई चलनवाढ बेकारी ही समस्यांची मालिका म्हणजे एक दुष्टचक्र आहे तेथील उद्योजक शिक्षण तज्ञ आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील अव्वल दर्जाचे धुरीन या धोरणाला कमालीचे वैतागले आहेत पण करतील काय धरले तर चावते आणि सोडले तर पळते अशी या अर्थशास्त्राची गत झाली आहे. प्रस्तुत लेखामध्ये प्रामुख्याने ट्रम्प धोरणाचा भारतावर काय परिणाम होईल, भारताशी सुसंवाद साधण्याची ट्रम्प यांची पद्धती अलीकडे थोडी शासन बनली आहे.





अस्थिर धोरणे आणि प्रश्नचिन्ह

ट्रम्प नीतीचे विश्लेषण करताना असे दिसते की अस्थिर धोरणे आणि सतत बदलणारी समीकरणे यामुळे प्रश्न सोडविण्यापेक्षा प्रश्नचिन्ह निर्माण करण्यातच ट्रम्प प्रशासनाला मोठी गंमत वाटते पण त्यामुळे त्यांची विश्वासार्हता कमी होत आहे. ही गोष्ट त्यांच्या लक्षात येत नाही, भारताला मृत अर्थव्यवस्था संबोधल्याने कोणाचे नुकसान झाले. खरे तर भारतीय नेते मोठे आणि कमालीचे संयमी आहेत.

ट्रम्प धोरणांचा भारताच्या आर्थिक वाटचालीवर काहीही प्रतिकूल परिणाम होणार नाही कारण भारताची अर्थव्यवस्था सुदृढ आहे, निरोगी आहे भारतीय बाजारपेठेत आपल्या स्वदेशी वस्तूंचा वापर करून त्यांची मागणी वाढविण्याचे भारतीयांचे तंत्र अजून अमेरिकेला समजलेले नाही. नवीन सहस्त्रकात २००४, २०१२, २०१९ अशी तीन चार वेळा मंदी आली आणि गेली पण त्या मंदीचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर प्रतिकूल परिणाम झाला नाही कारण भारतीयांना लागणाऱ्या वस्तू व सेवा निर्माण करण्यात भारतीय उद्योजक कमालीचे खंबीर व मजबूत आहेत ही गोष्ट अमेरिकेच्या लक्षात येत नाही काय?

भारताचा सावध पवित्रा

डोनाल्ड ट्रम्प यांच्या आर्थिक आयात धोरणांचा संभाव्य धोका लक्षात घेऊन भारताने या अगोदरच सावध पवित्रा घेतला आहे. ऑटो पार्ट्स कापड इलेक्ट्रॉनिक्स या व्यवसायावर अमेरिकेच्या टेरिफ धोरणाचा संभाव्य परिणाम होऊ शकतो पण भारतीय उद्योजक आता याबाबतीत इतर देशाशी संपर्क साधत आहेत म्हणजे अमेरिकेने हात टेकले, विरोध केला तर त्यामुळे भारताचे फार मोठे नुकसान होईल असे नाही, उलट अमेरिकेला भारतीय बाजारपेठ गमवावी लागेल. अमेरिकेबरोबर आजवर भारताच्या चार बोलण्याच्या फेऱ्या झाल्या पण भारत आपल्या भूमिकावर ठाम आहे अमेरिका दबाव टाकत आहे पण भारताने त्याबरोबर न झूकता आपले स्वतःचे ठाम धोरण निर्धाराने पुढे रेटले आहे भारताला केवळ तात्पुरता विचार करून चालणार नाही तर दीर्घकालीन धोरणे समोर ठेवावे लागतील. असुरक्षित क्षेत्राच्या बाबतीत अत्यंत सावधपणे पावले टाकावी लागतील कारण त्यामध्ये आपला फायदा आहे. घाईघाईने कोणतेही निर्णय घेऊन चालणार नाही त्यामुळे भारत दूध पोळले की ताक फुंकून प्यावे तसा सावध पवित्रा घेत आहे औषधे, पेट्रो केमिकल्स, ऑटो क्षेत्र यावर थोडा परिणाम होऊ शकतो परंतु त्याबाबतीत फारसे घाबरण्याचे कारण नाही कारण भारताला युरोप आखाती देश तसेच आफ्रिकन देश असे कितीतरी पर्याय आहेत, सावधगिरी म्हणून आपणास सतत नव्या पर्यायांचा शोध घेणे आवश्यक आहे.

पाऊल आपले जपून टाका...

सावध ऐका पुढील हाका..पाऊल आपले जपून टाका... अशी एक काव्यपंक्ती आहे.

सरकार अमेरिकेच्या कारवायांना उत्तर देण्यासाठी शांत आणि विचारपूर्वक पावले टाकत आहे मोदी सरकारच्या या सावध धोरणाचे विविध व्यापार गटांनी स्वागत केले आहे आणि सरकारच्या भूमिका उचलून धरल्या आहेत.

खरे तर भारताला ट्रम्प यांच्या टेरिफ धोरणापासून सावरण्यासाठी सध्या मोदी सरकारचे जे धोरण आहे ते खरोखरच रास्त आणि योग्य आहे थांबा आणि वाट पहा या तत्त्वाचा वापर करून सरकार प्रत्येक पाऊल जपून टाकत आहे. भारताने अल्पकालीन लाभ किंवा नुकसान समोर ठेवून आपले दीर्घकालीन धोरण बदलता कामा नये. ट्रम्प यांच्या गोंधळात टाकणाऱ्या टेरिफ बॉम्बला आपण आपल्या स्वदेशी ब्रम्हास्त्रने लढू शकतो. खरे तर गेल्या दहा वर्षापासून भारताने मेक इन इंडिया पुढाकार घेतला आहे आणि आपल्या गरजा आपण पूर्ण करत आहोत. आपल्या उपभोगाच्या वस्तू व सेवा आपण निर्माण करत आहोत आणि जगभर त्यांचा लौकिक वाढल्यामुळे त्यांची मागणीही वाढत आहे, अशावेळी नवनव्या बाजारपेठा काबीज करणे महत्त्वाचे आहे. एकट्या अमेरिकेला काय हिंग लावायचे आहे. ठीक आहे अमेरिकेच्या जबर आयात शुल्कांमुळे येथील काही वस्तूंचा व्यापार थांबला तरी त्या वस्तू व सेवा आपण जगाच्या इतर देशांमध्ये निर्यात वाढ करून ते नुकसान भरून काढले पाहिजे.

ट्रम्प यांनी त्यांच्या धर-सोड भूमिकेने कितीही त्रास दिला तरी ट्रम्प यांच्या दबावाच्या राजकारणाला बळी न पडता सावधपणे जागरूक राहून रोखठोक भूमिका घेणे आवश्यक आहे. बदला घेण्याची भावनिक भूमिका न घेता संवाद आणि समन्वय या आधारे प्रश्न सोडविण्यावर आजवर भर दिला जात होता. नजीकच्या भविष्यकाळात भारताला अमेरिकेतून येणाऱ्या वस्तूंची काळजीपूर्वक चाचणी घ्यावी लागेल तसेच आपल्या उद्योगपतींची चर्चा करून ठोशास ठोसा या न्यायाने कडक भूमिका घ्यावी लागेल. आपली निर्यात धोरणे काटेकोरपणे राबवावी लागतील. साप भी मर जाये और लाठी भी न टूटे अशी जागरूकता आवश्यक आहे. भारताने ट्रम्प यांची स्वार्थी प्रवृत्ती लक्षात घेवून शेतकरी व कष्टकऱ्यांचे हितं लक्षात घेवून शेती क्षेत्रामध्ये अमेरिकेच्या हस्तक्षेपास साफ नकार दिला आहे. आटो क्षेत्र, कापड उद्योग तसेच इलेक्ट्रॉनिक्स उद्योग याबाबतीत अमेरिकेची निर्यात धोरणे कठोर करण्याचा ट्रम्प यांचा मनोदय आहे परंतु भारताने याबाबतीत आपल्या कुठल्याही क्षेत्रावर प्रतिकूल परिणाम होऊ नये म्हणून पर्यायी व्यवस्था तयार करावी आणि सावध पावले टाकावीत म्हणजे त्यामुळे नुकसान टाळता येऊ शकेल. याबाबतीत तत्काळ तीन प्रमुख उपाय योजले पाहिजेत पहिले म्हणजे आशिया आफ्रिका आणि लेटिन अमेरिकेतील ज्या क्षेत्रावर अमेरिकेचा प्रतिकूल परिणाम होऊ शकतो त्याबाबतीत आपण पर्यायी बाजारपेठा शोधल्या पाहिजेत त्या मजबूत केल्या पाहिजेत दुसरे म्हणजे आपल्या वस्तू व सेवांची गुणवत्ता वाढवून अमेरिकेच्या वस्तूपेक्षाही आपला दर्जा अधिक उंचावला पाहिजे व तिसरे म्हणजे भविष्यकाळात भारताला तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था व्हावयाचे आहे आणि भारताची ही अग्रेसर वाटचाल पाहून ट्रम्प यांच्या पोटात दुखत आहे. त्यामुळे ते उलटी पावले टाकत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेला आपले जगातील तिसरे स्थान साध्य करावयाचे आहे आणि आता लक्ष टप्प्यात आले आहे, अशावेळी कोणताही धोका होता कामा नये हे लक्षात घेऊन सावध पावले टाकायची हाच खरा मार्ग होय.

शेती क्षेत्रासोबत दुग्ध उत्पादनाचे क्षेत्र असो याबाबतीत भारताने स्वतःची विपणन व्यवस्था विकसित केली आहे आणि या संवेदनशील क्षेत्रात कुठल्याही पाश्चात्य देशाला घुसू देता कामा नये. जरी ट्रम्प यांचा प्रयत्न भारतामध्ये मका आणि सोयाबीन बळजबरीने विकण्याचा असला तरी भारताने त्याला साफ नकार दिला आहे. कारण आपल्या शेतकऱ्याचे हित हे दीर्घकालीन दृष्टीने महत्त्वाचे आहे

(क्रमशः)

## वास्तुशास्त्र पेंटिंग

लघुलेख: ११



'वास्तुशास्त्र पेंटींग' बनविण्यासाठी काय प्रक्रिया आहे? या आशयाचे फोन गेले तीन-चार दिवसांपासून मला येत आहेत. त्यावर या लघुलेखात आपण संक्षेपाने माहिती घेऊयात.

गृहीत धरा की, ही माहिती वाचून 'अ' या व्यक्तीने मला सकाळी ९.१३ ला संपर्क साधला. तर त्या. ९.१३ ची होरा कुंडली मी तयार करतो. त्या 'अ' या व्यक्तीच्या आणि त्यांच्या सौभाग्यवतीच्या नावावर त्यांचा १००० स्केअर फूट फ्लॅट आहे. म्हणून त्या दोघांची कुंडली मी, त्यांच्याकडून मागवतो. त्यांच्या कडे त्यांची कुंडली नसेल तर आवश्यक माहिती मी त्यांच्याकडून मागवतो आणि त्यांची कुंडली बनवतो आणि तिसरी कुंडली त्यांच्या फ्लॅट्ची बनवतो, त्यासाठी त्यांची 'रजिस्ट्रेशन' च्या पहिल्या पानाची सत्यप्रत हवी असते. त्यावर घराची नोंदणी कधी, केव्हा आणि किती वाजत्ता झालेली आहे. याचा तपशील असतो.

अशा प्रकारे एकूण तीन कुंडल्यांचा अभ्यास करून सदर 'अ' या व्यक्तीला तिच्या फ्लॅटसाठी कमीतकमी १० चौरस फूट आकाराचे क्षेत्रफळ असलेले 'वास्तुशास्त्र' पेंटींग बनवून दिले जाते. १००० चौरसफुट फ्लॅट ची "प्रपोर्शनेट स्मॉल साइज" १० ×१० चौरस फूट असल्याने या आकारातील पेंटींग त्यांना दिले जाते.

या पेंटींग मधील रंग, रंगछटा, रंगाकार, प्रतिके, चिन्हे, श्लोक, मंत्र आदी घटक हे फक्त आणि फक्त 'अ' यांच्याशीच संबंधित असतात? ते पेंटींग' हे फक्त त्यांच्याच वास्तुला संबंधित असल्याने, त्या पेंटींग मधीन रंग, त्या पासून निघणारी तेजो किरणे, आणि त्या पेंटींग मधील आकार-चिन्ह आदि तपशीलात्मक घटक, हे त्या 'अ' यांच्या परिवाराशीच संबंधित असल्याने, कमीत कमी एक सप्ताह आणि अधिकाधिक सहा महिन्यांच्या कालावधीत, 'अ' आणि त्यांच्या परिवाराला फक्त आणि फक्त सकारात्मकच अनुभूती यायला सुरुवात होते...!!

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान
डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




## जात्यावरच्या ओव्या......

लाडाच्या लेकीचं
तोंड जळत भाजीन
साखर सोजीची
सवं लावली आजीन ॥१९३॥

लाडयाचे लेकी
तु त तांब्याची घागर
जाशील पर घरा
डोळा लागन पाझर ॥१९४॥

संदर्भ- शांताई इंगळे
संकलन- सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

## तात्या आणि सोमनाथ ...
### (माझ्या चांदणेशब्द फुलांचे या पुस्तकातील लेख)



उगवतीचे रंग

विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

सोमनाथ मिस्त्री दिसायला तसा देखणा, उंचपुरा आणि पिळदार शरीर असलेला होता. सोमनाथ मिस्त्रीच्या बाबतीत आणखी एक गोष्ट माझ्या लक्षात आली होती. तो सकाळी येताना जेवढा फ्रेश असायचा तेवढाच फ्रेश संध्याकाळी परत जाताना असायचा. मला त्याचा हेवा वाटायचा. त्या कालावधीत माझ्या आरोग्याच्या तक्रारी खूपच वाढल्या होत्या. पोटाच्या तक्रारी, अंगदुखी, डोकेदुखी इ नी मला हैराण केले होते. काही टेस्ट केल्यानंतर डॉ नी कोलेस्टेरॉल वाढल्याचे मला सांगितले होते. त्यावेळी सोमनाथ मिस्त्री आणि तात्यांचे एवढे कष्ट करूनही आणि साधे भाकरी चटणीचे जेवण घेऊनही सदैव ताजेतवाने राहणे मला आश्चर्यचकित करणारे होते. एकदा मी सोमनाथ मिस्त्रींना विचारलेच, मिस्त्री, तुम्ही नेहमी अगदी फ्रेश दिसता. सकाळी येताना जेवढे फ्रेश असता तेवढेच फ्रेश संध्याकाळी. काय रहस्य आहे ?




यावर सोमनाथ मिस्त्रीने जे उत्तर दिले त्याने माझ्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. जेमतेम सातवी आठवी शिकलेल्या या माणसाचे आयुष्याच्या बाबतीतले आणि व्यवहाराचे ज्ञान उत्तम होते. सोमनाथ मला म्हणाला, सर, पूर्वी मी जिममध्ये व्यायाम करण्यासाठी जात होतो. पण आता जमत नाही. पण रोज सकाळी मी पाच वाजता उठतो. आस्था चॅनेल पाहतो. रामदेव बाबांनी सांगितल्याप्रमाणे योग, प्राणायाम करतो. एकही दिवस हे चुकत नाही. भस्रिका, कपालभाती आणि अनुलोम विलोम या प्राणायामाच्या प्रकारांमुळे अगदी फ्रेश वाटते. शिवाय जास्त तेलकट, तिखट, मसालेदार खात नाही. रोज घरचेच जेवण जेवतो. मला त्याचे फार कौतुक वाटले.

त्याने सांगितलेल्या या गोष्टी मला माहित नव्हत्या असे नाही. पण आपली अवस्था बऱ्याच वेळा कळते पण वळत नाही अशी होते. आम्ही सुशिक्षित माणसे वेळ नाही या नावाखाली व्यायामाला वेळ द्यायचे टाळतो. शारीरिक कष्टही फारसे होत नाहीत. शिवाय अलीकडे हॉटेलिंगचे प्रमाण शहरातील सुशिक्षित वर्गात खूप वाढले आहे. त्यामुळे साहजिकच आरोग्याच्या तक्रारी वाढल्या आहेत. सोमनाथ नकळत मला काहीतरी शिकवून गेला होता.

मी पूर्वीही योग, प्राणायाम इ करीत होतो पण त्यात नियमितता नव्हती. आता मात्र दररोज सकाळी उठून योग, प्राणायाम नियमितपणे करतो आहे.

सगळे काम संपल्यावर मी सोमनाथ आणि तात्यांना खास घरी बोलावून त्यांचा आदरसत्कार केला. सोमनाथ आणि त्याच्या मुलाला वाचनाची आवड असल्यामुळे मी माझी दोन पुस्तके त्याला भेट दिली आणि तात्यांचा शाल देऊन सत्कार केला. मोठमोठ्या लोकांचा सत्कार तर कोणीही करेल पण या अशा मंडळींचाही गौरव होणे आवश्यक आहे. माझ्या या सत्कारामुळे आणि प्रेमामुळे ही मंडळी अक्षरशः भारावून गेली. मी काही फार केले नव्हते. त्यांनी नकळत मला जी काही अमूल्य शिकवण दिली होती त्याचा कुठेतरी उतराई होण्याचा हा प्रयत्न होता. त्यांनी आजपर्यंत अनेक ठिकाणी काम केले होते पण असा आनंददायी अनुभव त्यांना पहिल्यांदाच आला होता. अजूनही ती मंडळी कधी या भागात काही कामासाठी आली तर मला भेटायला आवर्जून येतात.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## उपदेशलक्षण

ज्योतिर्मय साहित्य

सहा चक्रे

मूलाधार, स्वाधिष्ठान, मणिपूर, अनाहत, विशुद्ध आणि सहस्त्रदल,

प्राण व अपान यांचे मिलन करून सुषुम्ना नावाच्या कण्यांतील सुक्ष्म नाडीच्या मार्गाने प्रत्येक चक्राचे भेदन करून प्राण मूध्नि आकाशात न्यावयाचा असतो.

अजपाजय - माणूस जीवंत असेपर्यंत त्याचा श्वासोच्छ्वास अखंड चालू असतो. तो आपोआप होणारा जप आहे. श्वास आत घेताना सो व श्वास बाहेर सोडताना हम् असा सूक्ष्म नाद होतो,त्या नादावर मन एकाग्र केलें तर चोवीसतास विनासायास जप चालतो. त्यालाच अजपाजप म्हणतात.

सगुणसाकारभक्ति, निर्गुणनिराकार भक्ति, तिर्थाटन, करावे असे सांगतात.


कोणी शक्तिमार्ग सांगतात देवीची उपासना करण्याचा मार्ग,

आत्मज्ञानावाचून उपदेशाचे सर्व प्रकार व्यर्थ आहेत. आत्मज्ञानासारखे पावित्र्य दुसऱ्या कशातचं नाही. म्हणून आत्मज्ञान प्राप्त करून घ्यावे. सर्वात श्रेष्ठ आत्मज्ञानाचा उपदेश आहे. हे विसरू नये.

माणूस कोणत्याही वर्णाचा असो त्याच्या अंगी जर आत्मज्ञान स्थिरावले तर या जगात तो जन्मोजन्मी परमात्म्याचा दास होतो.

उपदेशनाम समास ४ था समाप्त
श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ

## सत्समागम हा सर्व साधनांचा राजा !



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

मनुष्यजन्माला येणे, संतांची भेट होणे आणि त्यांना ओळखून त्यांचा सहवास होणे या तिन्ही गोष्टी फार दुर्घट आहेत. म्हणूनच संतसमागमासारखा लाभ नाही असे म्हणतात. सत्समागम म्हणजे सर्व साधनांचा राजा होय. काही मागण्याची इच्छाच संत नष्ट करतात, मग मिळवायचे कुठे राहते ? संत बनणे व्यावहारिकदृष्ट्या काही सुखाचे नसते. एखाद्या स्नानसंध्याशील आणि सदाचरणी माणसाच्या अंगावर तेज दिसते, कारण देहाला धरून झालेल्या कर्माचे ते तेज असते; पण एखाद्या सत्पुरुषाच्या देहावर बाहेर तसे तेज दिसणारही नाही. आत वावरणाऱ्या भगवंताच्या ज्ञानाला योग्य असा सत्पुरुषाचा देह असतो. देहाच्या आधाराने भोगण्याची या जगामधली जी सुखे आहेत, त्यांचे मार्ग सत्पुरुषापेक्षा आपण प्रापंचिक लोक जास्त जाणतो. परंतु देहाच्या पलीकडे असणारे आणि कायमचे टिकणारे, आणि देहाला विसरून आणि देवाला स्मरून जे मिळवायचे, असे भगवंताचे सुख आहे. ते प्राप्त होण्याचा मार्ग समजावून घेण्यासाठी आपण सत्पुरुषाकडे गेले पाहिजे. विषयतृप्तीसाठी जावे आणि निर्विषय होऊन यावे, हा संतसंगतीचा परिणाम. असा जो असेल तोच संत, नव्हे, प्रत्यक्ष भगवंत होय. अशांची संगती केव्हा होईल ही तळमळ असावी. संत आपल्याला सत्यस्वरूपाची ओळख करून देतात. सत्पुरुषाने आखून दिलेल्या मार्गाने कायावाचामनाने जे कर्म केले जाते ते पौरुषच होय.

आगगाडीत बसणारी सर्व माणसे, मग ती कोणत्याही क्लासमध्ये बसणारी असोत, इतकेच नव्हे तर बिनतिकिटाची माणसेदेखील, गाडीबरोबर सरळ म्हणजे शेवटच्या स्टेशनापर्यंत जाऊन पोहोचतात; त्याचप्रमाणे संतांची संगत करणारी सर्व माणसे भगवंतापर्यंत पोहोचतात. त्यांच्यामधली बिनतिकिटाची, म्हणजे दुष्ट, पापी, दुराचारी, त्याज्य आणि अयोग्य अशी माणसेसुद्धा तरून जातात; मात्र कोणीही गाडी तेवढी सोडता कामा नये. हाच सत्संगतीचा महिमा. परमार्थ साधण्यासाठी सत्संगती फार उपयोगी पडते. ही संगती तीन प्रकारची असते : एक, संताचा प्रत्यक्ष देहामध्ये सहवास; दोन, संताने सांगितलेल्या मंत्राचा सहवास; आणि तीन, संताच्या विचारांची संगत. संगतीचा परिणाम नकळत होतो, म्हणून सत्संगती धरावी. आपण ज्याकरिता जन्माला आलो ते कारण फक्त संतच उमगले; म्हणून त्यांना शरण जावे. संत स्वत: समाधान मिळवून ते दुसऱ्याला देतात, हे त्यांचे आपल्यावर केवढे उपकार आहेत !

संतांजवळ जे समाधान असते ते आपल्याला लाभले, म्हणजे संताची प्रचीती आली असे समजावे.

## ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

### संत ज्ञानेश्वर महाराज यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

इथेही आपणास विषयाकडे वळलेले मन दु:ख देणारे तर ब्रह्मरूप झालेले मन हे सुख देणारे, महानंद देणारे व उन्मनी अवस्थेत गेलेले दिसून येते.

तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात

नको नको मना गुंतू माया जाळी
काळ आला जवळी ग्रासावया
काळाचीए उडी पडेल बा जेव्हा
सोडविना तेव्हा मायबाप

विषयात अडकलेले मन हे माया जाळात अडकलेले आहे तिथे त्याला गुंतू देऊ नकोस तर ते ब्रह्मरूप कर आत्म्याकडे वळव कारण केव्हाही काळ ग्रासेल असेच तुकाराम महाराज सांगतात.

समर्थ रामदास स्वामी मनाविषयी काय म्हणतात तेही आपण पाहू

मना पाप संकल्प सोडून द्यावा
मना सत्य संकल्प जीवि धरावा
मना कल्पना ते नको विषयाची
विकारी घडे हो जनी सर्व ची ची

विषयात अडकलेले मन हे पाप संकल्प करणारे असते तर सत्य संकल्प हा केवळ आत्म्यात लीन होणारे मनच करू शकते. ते करावे. मनात विषयांची कल्पना करू नये. कारण त्यामुळे विकार ग्रस्त मन होते. असेच रामदास स्वामी हे सांगतात.

संत कबीर म्हणतात कबीरा मन निर्मल करे जैसे गंगाका नीर पाछे पाछे हरी फिरे कहत कबीर कबीर मनातील विकारांचा मळ काढून मन हे गंगेच्या पाण्या सारखे निर्मळ करायला हवे. त्यासाठीची साधना करायला हवी. असे केले तर तुम्हाला परमेश्वराच्या पाठीमागे लागण्याची गरज नाही, तर उलट तोच तुमच्या पाठीमागे लागेल. असे कबीर म्हणतात.

आपले मन स्वाभाविकपणे विषयाकडे वळलेले असते. यात सतत नवनवीन कल्पना चे उन्मेश भरून येतात. इच्छा आकांक्षा जन्म घेतात व म्हणूनच असे मन हे अल्पजीवी सुख व दीर्घकाळ दु:ख देणारेच ठरते या अल्पजीवी सुखाकडून शाश्वत सुखाकडे जायचे असेल तर मनाचा फेर उलट करून आत्म्याकडे वळवावा लागेल. आणि यासाठी सद्गुरुला शरण जाऊन त्यांच्या सानिध्यात कठोर साधना ही करावी लागेल. अशी साधना आपण करावी असेच संकेत ज्ञानेश्वर माऊली या अभंगातून आपणास देत आहेत.

जीवनाचे ध्येयच मुळी दु:खाची निवृत्ती व सुखाचा शाश्वत लाभ हेच आहे दु:खाचा त्याग होऊन सुखाचा लाभ कसा मिळावा याचा मूलमंत्र देणाऱ्या महान मानसोपचार तज्ञ संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या चरणावर विनम्र भावाने प्रणिपात करून हा भाग इथे संपवूया

निवृत्ती ज्ञानदेव सोपान मुक्ताबाई एकनाथ नामदेव तुकाराम
जय हरी माऊली

***

## ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

१७. राहीन सर्वस्व अर्पूनी।।

पहा आमुचा रूबाब। त्यासी नसे रे जबाब।
विश्वाचिया मालकीण। मैत्रीण ही वैतरणी।।
शक्ती पायी आम्ही आलो। शक्तीची कृपा पावलो।
ऐसिया प्रतिज्ञा केली। शक्ती पूजीन जीवनी।।
मायपिताबहिण। बंधु चुलता चुलती।
आमुची तो सर्व नाती। पाहे ठायी भवानी।।
माय आम्हां पाठीराखी। उरले रे काय बाकी।
हास म्हणे मी पायी। राहीन सर्वस्व अर्पूनी।।

१८. सद्गुरुकृपा

माझी नाही रे रचना। नाही माझी रसना।
शब्द गुरुप्रसादाचा। नाही कोणाचा उसना।।
सद्गुरू रे माझा थोर। बसे नित्य पद्मासना।
साधे अंबेसी संवादु। मंत्रजप रात्रंदिना।।
त्यांसी रेणुका प्रसन्ना। नमावे त्या भगवाना।
गुरु सांगे ज्या वचना। चंद्रहासा येई काना।।



आरोग्य संजीवनी

## सोरायसिस लक्षणे

ज्योतिर्मय साहित्य

सोरायसिस हा त्वचारोग होण्यामागची कारणं आणि त्याचे प्रकार वेगवेगळे असल्यामुळे तुम्हाला त्याची प्राथमिक लक्षणे आधीच माहीत असायला हवी. ज्यामुळे यावर लवकर निदान करणे शक्य होईल. यासाठी जाणून घ्या सोरायसिस लक्षणे

**त्वचेला खाज येणे**

सोरायसिसचे लक्षण प्रत्येक व्यक्तीमध्ये वेगवेगळे असू शकते. मात्र साधारणपणे सर्वांनाच या त्वचा विकारा मध्ये त्वचेवर भयंकर खाज येते. एवढंच नाही तर अती खाजवण्यामुळे त्वचेचे पापुद्रे निघतात आणि त्वचेवर सूज दिसू लागते.

**कोरडी आणि भेगाळलेली त्वचा**

त्वचेवर नवीन होणाऱ्या त्वचापेशींचा थर जमा झाल्यामुळे त्वचेचं योग्य पोषण होत नाही आणि त्वचा कोरडी आणि निस्तेज होते. काही जणांमध्ये त्वचेवर भेगा पडलेल्या दिसू लागतात तर काहींची त्वचा या रोगामध्ये कोरडी झाल्यामुळे तिचे पापुद्रे सुटू लागतात.

**स्काल्पमध्ये खाज**

सोरायसिस हा आजार केसांमध्येदेखील होत असल्यामुळे त्यामुळे तुमच्या स्काल्प लालसर होतो. केसांमध्ये लालसर आणि जाडसर चट्टे उठतात, केसांमध्ये कोंड्याप्रमाणे पांढरा पदार्थ तयार होतो. स्काल्प कोरडा झाल्यामुळे केसांचे नुकसान होते, केस भरपूर प्रमाणात गळू लागतात. त्वचेला प्रंचड खाज येते आणि दाह जाणवतो.

**त्वचेतून येणाऱ्या वेदना**

सोरायसिसमध्ये त्वचेला खूप खाज येते ज्यामुळे त्वचेमध्ये दाह निर्माण होतो आणि जळजळ जाणवते. सहाजिकच या दाह आणि वेदनेतून मुक्तता मिळावी असं रोग्याला वाटू लागतं. या त्वचारोगाने गंभीर रूप धारण करू नये यासाठी खाज आल्यावर त्वचा हाताने खाजवू नका.

**नखे ठिसूळ होतात**

जर तुम्हाला नखांचा सोरायसिस झाला तर यामुळे तुमची नखे ठिसूळ होतात. नखांच्या वरील आवरण हे केरॅटिन सेल्समुळे कठीण असते. मात्र या रोगात तुमच्या या नखांच्या पेशींचे नुकसान होते आणि नखे ठिसूळ आणि भेगाळतात. नखांचा आकार, जाडसरपणा आणि रंग नेहमीपेक्षा वेगळा दिसू लागतो. नखं ठिसूळ झाल्याने पटकन तुटतात.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

**सांधे दुखी**

सोरायसिस तीव्र झाल्यास त्यामुळे तुम्हाला सोरायटिक आर्थ्राटीसचा त्रास जाणवू शकतो. सोरायटिक आर्थ्राटीसमुळे तुमच्या सांध्यावर वाईट परिणाम होतो. तुमच्या एक अथवा दोन्ही बाजूचे सांधे यामुळे दुखावले जाऊ शकतात. यामुळे हाता-पायाच्या सांध्यामध्ये सूज आणि वेदना होतात. वेदनेची तीव्रता इतकी वाढत जाते की यामुळे तुम्हाला दैनंदिन कामे करणेही कठीण होते.

**सोरायसिसची कारणे**

सोरायसिस होण्यामागची कारणे प्रत्येक व्यक्तामागे वेगवेगळी असतात. त्यामुळे सोरायसिस होण्यामागचं नेमकं कारण कुणीच सांगू शकत नाही. मात्र ही काही कारणं आहेत ज्यामुळे सोरायसिस होऊ शकतो.

**अनुवंशिकता**

काही संशोधनात असं आढळलं आहे की जर एखाद्याच्या आई-वडीलांना, आजी-आजोबांना अथवा भावंडांना सोरायसिस झाला असेल तर त्या व्यक्तीला सोरायसिस होण्याचा धोका इतरांच्या तुलनेत जास्त असतो. यामागे त्यांच्यातील अनुवंशिकता कारणीभूत असू शकते. जरी तुमच्यामध्ये अनुवंशिक गुण असले तरी वातावरणातील बदलामुळेच हे गुणधर्म कार्यान्वित होतात. त्यामुळे जोपर्यंत वातावरणात असे बदल होत नाहीत तो पर्यंत सोरायसिस त्या व्यक्तीमध्ये सहज विकसित होत नाही.

(क्रमश:)

## ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

सटवी ला रावणाचे पाय दाबायचे काम होते.ही सटवी बालकांचे भविष्य सहाव्या दिवशी बालकाच्या कपाळावर लिहिते.रावण म्हणाला माझे मरण केंव्हा ते सांग. सटवी म्हणे मी फक्त लिहू शकते. मला काय लिहिले हे वाचता येत नाही.रावण चिडला. तू माझी दासी आहेस सांग. तेंव्हा तिने त्याच्या हातावर कुंकू टाकून हात चोळण्यास सांगितले.त्यात असे दिसले की, अज राज्याचा राम नावाचा नातू तुला मारील. रावण अज राज्याशी युद्ध करण्यास तयार झाला.ब्रम्ह देव म्हणे तू का लढतोस? तो म्हणे याचा नातू मला मारणार आहे म्हणून. मग ब्रम्ह देव म्हणाले की अज राजा शुर आहे. तो युद्धात तुला सहज हरवेल. त्यापेक्षा तू त्याच्या मृत्यूची प्रतीक्षा कर. त्याचा मृत्यू , समोर एक मोठा दरवाजा होता ,तो नष्ट झाला की होणार होता. रावणाने त्या दाराला तोडण्या साठी जोरात लाथ मारली.तेंव्हा आतून एक कर्कश्य किंकाळी ऐकू आली.ती भस्मासुराची होती. त्यास रावणाने बाहेरूनच विचारले की का किंचाळत आहेस,तुम्ही कोण आहात?तो म्हणाला मी भस्मासुर या दाराच्या आतही आर्या आहेत त्या माझ्या डोळ्यावर टेकवून मला आत बांधले आहे.कोण्या मूर्खाने आता दार ढकलले व माझे डोळे फुटले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

(क्रमश:)

## फुलमाला....




कॉसमॉस फुल (ब्रम्हांड फुल)


कॉसमॉस फुल मेक्सिको देशांमधून भारतात आले.
इकडे उष्ण कटिबंध आहे म्हणून चांगलेच रुजले...

या फुलांचा बहार असतो वर्षातून उन्हाळ्यात एकदा
चमकत्या रूपामुळे फुलपाखरे या फुलांवर भिरभिरती
सर्वदा..

मध्यम आकार आणि सुंदर सुंदर रंगात ही फुले फुलती
आपल्या आकर्षक रूपामुळे सजावटीमध्ये चांगलीच
खुलती ..

सौ. माधुरी म.इनामदार, मिरज





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय साहित्य

### कर्मयोगी रवींद्रनाथ


गुरुदेवांना न्यूयॉर्कमध्ये भेटलेला एल्म हर्स्ट हा हा तरुण त्यांना भेटल्यानंतर अंतर्बाह्य बदलून गेला. गुरुदेवांकडून कोणतेही पैशांची अपेक्षा न करता तो भारतात आला आणि ग्राम विकासाचे कार्य करू लागला. स्वतःचे घर साफसूफ करण्यापासून त्याच्या कामाची सुरुवात झाली. रॉबरी ऑफ द सॉइल हा संशोधन पर प्रबंध त्याने लिहिला. त्यात त्याने ग्रामीण भागातील दुरावस्थेचे चित्र संशोधन करून मांडले व त्यावर उपाय सुचवले.

कोणतेही काम करताना त्यामध्ये सौंदर्यदृष्टी ठेवून केले असता ते चांगले होते असा गुरुदेवांचा नेहमीच आग्रह असायचा. त्यामुळे शांतिनिकेतन किंवा श्रीनिकेतनमधील सर्व कामांना व्यवहार्यतेसोबतच सौंदर्यदृष्टीची जोड लाभली होती.


गुरुदेवांना कामाची आणि शिकवण्याची ठोकळे बंद विभागणी कधीही मान्य नव्हती. त्यांच्या शांतीनिकेतनमधील लायब्ररीत कारकुनी करणारे चैतीबाबू संध्याकाळी संगीत भवनात दिलरुबा घेऊन विद्यार्थ्यांसमोर उत्साहाने हजर असायचे. ते वयाने कितीही थकलेले असले तरी त्यांचा हा दिनक्रम अखंडित सुरू होता. त्यांच्या शाळेतील चित्रकलेचे प्राचार्य दिनकर कौशिक दा संध्याकाळी मुलामुलींच्या मेळाव्यात गाण्याच्या बैठकीला हजर असायचे. अमुक एक विषय किंवा विभाग तेवढा माझा. बाकीच्या गोष्टींशी माझा काही संबंध नाही अशासारख्या विचारांना गुरुदेवांचा कायमच विरोध होता.

स्वतः गुरुदेव याचे उत्तम उदाहरण होते. ते युरोपात गेले असताना फावल्या वेळेत चर्मकला शिकले होते. आणि मग श्रीनिकेतनमध्ये त्यांनी त्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना दिले. येथील चामड्याच्या वस्तू आज जगभर नावाजलेल्या आहेत. त्यांच्या सुनबाई पॉटरी शिकल्या आणि त्यांनी अनेक विद्यार्थ्यांना आधुनिक गिलाव्याचे तंत्र शिकवले. सुरेंद्रनाथ कार हे जावा बेटावरून बाटीक कला शिकून आले होते. मुकुल डे इंग्लंडहून छापखान्याचे तंत्र शिकून आले होते. ते भारतात आल्यानंतर वेगळ्या प्रकारच्या आलेखनाचा छापखाना सुरू झाला. नंदलाल बोस यांच्या मुलाने वूड कट ब्लॉक तयार करण्याची पद्धत सुरू केली. श्रीनिकेतन हे हळूहळू शेती, गोपालन, कुक्कुटपालन याबरोबरच जव्हेरी काम सोन्या-चांदीची कलाकुसर, शिळाछपाई, लाखेवरीलकलाकुसर, वस्त्रोद्योग अशा अनेक प्रकारच्या उद्योगांचे केंद्र बनले होते. मांणसाच्या व्यावहारिक गरजांबरोबरच त्याची कलेची भूक भागवण्यासाठी विविध प्रकारच्या वस्तू बनवणे ही श्रीनिकेतनची खासियत होती. या वस्तूंना जगभरातील बाजारात चांगली मागणी होती. गुरुदेवांना फक्त कला आणि कलाकार जगवायचे नव्हते. तर एकूणच समाजात कलादृष्टी वाढावी असे त्यांचे मत होते. श्री, शांती आणि सरस्वती यांचा सुरेख संगम व्हावा असे स्वप्न त्यांनी पाहिले आणि ते पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. त्यामुळे शांतिनिकेतनमधील विद्यार्थी आणि शिक्षक- प्राध्यापक देखील गुरुदेवांना अपेक्षित असेच घडत गेले. गुरुदेवांनी अशी शिल्पे जाणीवपूर्वक घडवली.

(क्रमशः)




# बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला या मराठी ग्रामीण कादंबरीचे लवकरच होणार प्रकाशन




ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – पिशोर आणि कन्नड तालुक्यावर आधारित बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला ही कादंबरी... आजच्या आधुनिक टेक्नॉलॉजीच्या युगात काही दिवसांनी लोक चंद्रावर राहायला जातील पण पृथ्वीवर राहत असलेल्या लोक जीवनाकडे विकास ठेंगणा होऊन अजूनही बरीच गावे प्राचीन काळातच जगत आहे. जिथे फक्त माणूस राहतो. बाकी काही सुख सुविधा नाही असे दुर्लक्षित गावे आणि त्यांचा विकास... गावातील लोकांच्या समस्या यावर आधारित ही कादंबरी आहे.

ही एक ग्रामीण कथा असून यात ग्रामीण भागाच रेखाटन केले आहे. या कादंबरीतला नायक बाळ्या बालपणापासून ते कमवता होईपर्यंतचा संघर्ष, कामाला देव मानणारा, कामातून दिवस रात्र समाजसेवा करणारा चित्रीत केला आहे. त्याच्या कठीण परिश्रमातून त्याला मिळालेलं आगळवेगळ अनपेक्षित यश दाखवलेलं आहे. आपल्या जीवनात कधी कुठली वेळ येईल सांगता येत नाही. ही कहाणी अशाच एका खेडयातल्या बाळ्या नावाच्या शेमडयाची आहे. होय तोच तो बाळ्या ठेंगडा होईपर्यंत अंगठा चोखणारा, बऱ्याच प्रयत्नातून कशीबशी बारावी काढलेला गरिबीच्या फुफाटयात वाढलेला, नेहमी करदोडयात बांधलेली सदाबहार पोस्ट ऑफीस खुले असलेली त्याची ती हाफ चड्डी आवरत गल्यांनी शेंबूड पुसत पळणारा, नाल्यावर हातात काठी घेऊन संडासाला बसणारा, डुकरांवर गुरगुरं आवाज करतं हातातली वेळूची काठी उगरत डुकरांना हाकलवून लावतांना भोगळाचं गल्ल्यांनी डुकरामागे पळणारा हा बाळ्या... माझ्या समोर जन्माला आलेला माझ्या समोर बालपण उधळणारा बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला आधुनिक काळाच्या दयनीय अवस्थेवर मात करून बिनविरोध आमदार झाल्याची ही यशोगाथा...

बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला ही कहाणी माझ्या कल्पनेतून जन्मलेली असून ही कहाणी वास्तवाशी एकरुपता दाखवणारी आहे. कहाणीचा प्रत्येक अंग प्रसंगाला जिवंत करणारा आहे. कहाणीची कल्पकता वास्तव्याशी जुळून येऊन आपल्या जीवनाचे चित्रीकरण आपल्याला या कहाणीतून बघायला, अनुभवायला मिळते. ही कहाणी वाचकाला आपल्या वर्तमान, भूत आणि भविष्यकाळाशी जोडते. फळाची अपेक्षा न करता आपण आपले काम प्रामाणिकपणे करत राहिलो तर विधीच्या विधानानुसार कर्म करो फल देगा भगवान ये तो गीता का ज्ञान... या श्लोकानुसार कर्म चांगले असेल तर चांगले फळही ह्याच जन्मात भोगायला मिळते असे आपणास नियती वेळोवेळी खुणावून सांगत असते. नियती कर्माचे भोग कसे बदलून टाकते यावर ही सगळी कहाणी आहे. निस्वार्थ मनाने आपण जेही काम करत असलो तर त्याच आपल्या आजूबाजूला असणारी शक्ती ही आपणास मदत करते. आपल्या या मानवी व्यवहारात तुम्ही केलेल्या कामाचा मोबदला योग्य मिळो वा ना मिळो आपण फक्त निरपेक्ष मनाने आपली पवित्र सेवा करावी. देणारा घेणारा बघत असतो या उक्ती प्रमाणे तसे देणारा काळ वेळ विचारुन काही देत-घेत नाही. जर देणाऱ्याला द्यायचे असेल तर तो छप्पर फाडके देत असतो. नि न्यायचे असेल तर सारं सुपडं साफ करुन नेतो. आणि देणाऱ्या घेणाऱ्याचं गणित हे कर्मफलावर ठरलेलं असतं. अशाच प्रसंगावर ही कादंबरी आधारित आहे. वाचक जेव्हा ही कादंबरी वाचेल तेव्हा वाचकाला ही कादंबरी एका प्रवासाला घेऊन जाईल. वाचकाचा जेव्हा कादंबरी सोबतचा प्रवास संपेल तेव्हा वाचकाला या प्रवासातून आपल्या आयुष्याच्या हितासाठी काहीतरी शिदोरी आपल्यासोबत बांधून नेण्याचा मोह होईल. वाचकाच्या जीवनाचा प्रवास बदलेल असा मी दावा करीत बाळ्या सायकल ॲम्बुलन्सवाला ही कादंबरी वाचकाला समर्पित करतो. वाचकांना माझी ही कादंबरी नक्कीच प्रेरणादायी ठरेल आणि ते तिचं आनंदाने स्वागत करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. धन्यवाद...




ज्योतिर्मय साहित्य

कडाडली ती विद्युल्लता ढगांचे वाजले ढोलताशे

काळ्या मेघांच्या रजईने टाकले वसुंधरेवर फाशे

काळ्या मेघांनी नभात गर्दी केली आणि म्हणता म्हणता आभाळ झाकोळून गेले. आकाशातील चमचम चांदणे क्षणार्धात लुप्त जाहले. पावसाच्या टप्पोऱ्या थेंबांचे सळसळ, रिमझिम संगित चालू झाले.असे वाटले नभांगणातून तारकांचा सडा माझ्या अंगणात पडला जणू!. तासभर मनसोक्त नर्तन करून वरूणराजा थकला आणि उंच टेकडीवरच टेकला. रविराजाने टेकडीमागून हळूच कानोसा घेतला आणि तांबूस पिवळ्या रंगांची आभा सहस्त्ररश्मींना सैलावत नभात फाकत अवतरला. आता काळ्या मेघांचे अवडंबर संपुष्टात आले होते आणि आकाशावर भास्कराचेच राज्य होते. त्याला आपल्या कोवळ्या सोनकिरणांनी चराचराला जागवायचे होते.

भास्कराच्या आगमनानेच घरट्यातील इवलीशी पिले किलबिलाट करणार होती. गोठ्यातील गाईगुरे हंबरनार होती, वासरे हुन्दडणार होती. कोवळ्या हिरव्या तृणपात्यांवर पहाटे पडलेल्या दवबिंदूंच्या थेंबांना चमकणारा हा भास्कर जगाचा अधिराजाच नव्हें का?


बारा तासाच्या विश्रांतीनंतर आपल्या सोनपावलांनी तो नभांगणात राज्यच करणार आहे. त्याच्या आगमनाने पसरलेली आभाळभर आभा साऱ्या चराचराला चैतन्य देऊन जाते.

वसुंधरेवरचा कणन् कण चेतनामयी होऊन जातो.

अंगणात पडलेला प्राजक्ताचा सडा त्या सोनेरी प्रकाशात चमकून उठला. भास्कराच्या सहस्त्र रश्मींचा अन् हरित असणाऱ्या वसुंधरेवर या तप्त उन्हाच्या सरींनी जणु वेढाच घातला. डोंगर टेकड्यांना स्पर्शण्यासाठी ढगांच्या मखमाली कापसातून निघालेले लक्ष कवडसे. रुपेरी आभाळातून हिरव्या धरित्रीवर येण्यासाठी आतुर झाले आहेत. ती चंदेरी किरणे अन् त्यातून सूर्यकिरणांच्या सरी प्रमाणे दिसणारी कवडसे!. किती सुंदर दृश्य !. प्रकाशकिरणे झेलण्यासाठी अधीर झालेली ही धरा वरुणराजाच्या प्रतिक्षेत अतृप्त आहे. कधी बरसेल हा वरूण, डोळ्यांतून वहातो आहे. लागावी एकच ठिणगी त्या ढगाला अन् फुटून जावेत मेघांचे फुगे! सरीवर सर येऊन शीण जावा निघूनी या धरित्रीचा ! साठून जावीत तळी तलावं नि टिपूर चांदणं गवसावं धरेवर.

इवलासा शिडकावा करून लुप्त झालेला हा वरूणराजा कुठे बरे अडकला असेल! पावसाच्या थेंबांची घेऊन तहान हा चातकही तरसलाय आभाळातल्या पाण्यासाठी! मोराचे नर्तनही बाकी आहे! म्याओ चार नारा करून जणू तो मृगाच्या शिंपणाची आतुरतेने वाट पहात आहे.

झरझर झरझर
झराव्या
पावसाच्या अशा
सरी
गाणी गातानना
नाचती
इवलाली पोरं नि पोरी




पावसात भिजण्याची गंमत काही निराळीच! भास्कराच्या तीव्र प्रकोपाने तृषार्त झालेली ही धरा. मेघराजाच्या आगमनासाठी अधीर झाली आहे.

"ये रे घना, ये रे घना,
न्हाऊ घाल माझ्या मना"
अशी केविलवाणी साद घालत मेघांना पुकारत आहे. तिच्या सादाला मेघाने प्रतिसाद द्यावा म्हणून ती आतुरलेली आहे. कधी बरसतील हे काळेकुट्ट घन आणि रिमझिमणाऱ्या जलधारा कधी करतील तृप्ती याच प्रतिक्षेत चराचरांतील जीव वाट पाहतो आहे. काळ्याशार मेघांनी दाटून यावे म्हणून प्रमिका आपल्या सख्याच्या ओढीने पाऊसधारांची वाट पहात आहेत

आला आला वारा,संगे पावसाच्या धारा

पाठवणी करा सया निघाल्या सासुरा

वृक्षांच्या फांद्याफांद्यातून उन्हाची तिरपी किरणे धरतीला स्पर्श करण्यासाठी धाव घेत आहेत.

नको उन्हांचं तळपणं
व्हावं जलधारांचं शिंपण
वाट पाहतेय तव सख्या
लेवूनी प्रीतीचंच लिंपण

मनाला तजेला देणारा हा पाऊस सर्वांच्या प्रीतीचं कोंदणंच नव्हे का ? त्याच्या बरसण्यानंच वसुंधरेवरचं हे वैभव खुलून फुलून जातं. आपल्या रिमझिम बरसण्यानं साऱ्या चराचरांवर चैतन्य पेरणारा हा पाऊस निसर्गाचा किमयागारच नव्हे का! मखमाली हिरवळीचा शालू पांघरून धरा जणू त्याच्या आगमनासाठी स्वागतास सज्ज होऊन बसली आहे. आकाशात चंदेरी रुपेरी विजांचा नेत्रपल्लव मनाला मोहित करून जातो. आणि त्यांच्या मधूनच रिमझिमणाऱ्या पावसाच्या या सरी!. निसर्गाचा हा मनमोहक देखावा हृदयाच्या अल्बममध्येच साठवून ठेवावा. रानभर फुललेली इवलाली रंगरंगूली गवतफुले डोळ्यांना तृप्ती देतात. विश्वाचा पसारा खांद्यावर घेऊन मिरवणारा भास्कर ढगाआड जाताच पुन्हा सारी सृष्टी चेतनाहीन होऊन जाते. थकलेल्या जीवाला विसावा देण्यासाठी.

# साजिंदा श्रावण

ज्योतिर्मय साहित्य
**(मागील अंकावरून)**

पूर्वीच्या काळी तुझ्या आगमनानंतर मोठमोठ्या वृक्षांना झोपाळे बांधले जात. अवखळ बाल्य झुलायचं त्यावर. ते फक्त सोयीकरता म्हणून झाडांना बांधले जात नसत, तर ते इथल्या स्त्रीजीवनाशी बांधले गेलेले प्रतीक होते. अजूनही काही ग्रामीण भागांत त्यांचं अस्तित्व दिसतं. स्त्रीच्या भावभावना आंदोलित करणारे झोके. उंचच उंच भरारी मारायचीय तिला, पण ती मारण्याकरता आधी खूप मागे जावं लागतं. हातापायांत जोर आणावा लागतो. कदाचित कुणाचं पाठबळंही हवंसं वाटतं अशा वेळी. ते मिळतंच असं नाही. मग स्वतःच स्वतःच्या पायाखालच्या जमिनीला जोरात मागे ढकलून झेप घ्यावी लागते. झोका उंचच उंच जातो. उंचावरून दूरवरचं श्रावण-क्षितिज खुणावतं. त्या क्षितिजावर असलेल्या आभाळात दाटून आलेलं असतं लोभस रंगांचं अप्रतिम चित्र.

त्याच्यातूनच दिसते तिला इंद्रधनुषी कमान. त्या कमानीमधूनच तिचा झोका आरपार जातो. त्या कमानीच्या सात रंगांमध्ये न्हाऊन निघतो. तिचा हा झोका जगरहाटीतल्या झोक्यासारखा नसतो.

जगावेगळा श्रावण-झोका असतो तो. कधी काळजाचा ठोका चुकवणाराही असतो. आपल्या मातीच्या, मातीतल्या माणसांच्या ओढीनं खाली येऊनही पुन्हा दुप्पट जोमानं त्या सप्तरंगी स्वप्नांमध्ये झेप घेणारा असतो.

आजच्या मेगा सिटीच्या जमान्यात किंवा अर्धवट शहरी झूल पांघरलेल्या गावांमध्ये हे असले श्रावण-झुले विस्मृतीत गेले असतील, किंवा दुर्लक्षित ठरले असतील. त्यांची गरजही नाही, पण मनांमध्ये हिंदकळणा-या श्रावण-झुल्यांचं काय? त्यांना खुणावणा-या इंद्रधनूचं काय? तू देशील का रे उत्तर?

बा श्रावणा, येतोस तू अजूनही आम्ही बिघडवलेल्या ऋतुचक्रामधूनही आपली ठरलेली वेळ पाळत.

बरसतोस अजूनही आमच्या सिमेंटी छपरांवर तसेच सरसर शिरवे टाकत.

दिसतोस तू शहरांपासून दूर असलेल्या रेखीव, पोपटी



चौकोनांमधल्या भाताच्या मुठीमध्ये आपल्या थेंबांना पेरताना.




बांधतोस अजूनही आपल्या परीनं जमेल तसं आमच्या माथ्यावर इंद्रधनुषी तोरण.

अजूनही तुझ्या तीस दिवसांच्या अख्ख्या चौकटी रंगवल्या जातात आमच्या कॅलेंडरमध्ये, बारा महिन्यांमधला असा मान मिळवणारा तू एकमेव.

आणि हो, वाटतो अजूनही काही जणांना चक्क तुझा धाक नि पाळतात ते महिनाभराकरता काही गोष्टी न खाण्याचा अन् न पिण्याचाही नियम.

विकायला येतात अजूनही मातीचे नाग, जिवत्यांची चित्रं.

दहीहंडीमागचा निरागस खेळकरपणा कधीच निघून गेला, पण कृष्णजन्म नि हंड्या होतात मात्र अजूनही दणक्यात.

दिसते रे अजूनही तुझ्याच खास दिवसांमध्ये येणारी पानं-पत्री, पण तू रानात उधळलेला हा ठेवा शहरी बाजारांत विकतच घ्यावा लागतो. आम्ही घेतोच.

तर असं बरंच काही.

सवंगड्या, श्रावणा, एकुणात काय तर तंत्राच्या ह्या युगात आर्टिफिशियल, कृत्रिम असं बरंच काही घडतंय आयुष्यात. पण तू मात्र अजूनही खरीखुरी, निर्भेळ साथसंगत करतोच आहेस आमच्या जगण्याला, आणि हो तीही मनापासून. हातचं काहीही राखून न ठेवता.

म्हणूनच तर आहेस तू एकमेव साजिंदा श्रावण.

तुझी ही पाचा उत्तराची न संपणारी, हवीहवीशी वाटणारी कहाणी साठा उत्तरी सुफळ संपूर्ण.

(अनहद या ललित लेखसंग्रहातून, ग्रंथाली प्रकाशन)

***



# गणपती आणि कुबेर

**ज्योतिर्मय साहित्य**

मित्रांनो, येत्या २७ ऑगस्टला श्रीगणेशाचे घरोघरी आगमन होणार आहे. श्री गणेशासाठी सुंदर अशी आरास केली जाईल. श्रीगणेशाची विधिवत प्रतिष्ठापना होईल. सुगंधी रंगीबेरंगी फुले, वेगवेगळ्या घरात वेगवेगळ्या प्रकारचे मखर, उदबत्या, दीप, मोदक,फळे आदींनी श्री गणेशा पुढे गर्दी होईल आणि वातावरण एकदम प्रफुल्लित होईल.

आजकाल नातेवाईक, मित्र, शेजारी, स्नेही, परिचित यांच्याकडील गणपती, जे सोशल मिडियावर पोस्ट करतात, त्या बाप्पांचे दर्शन आपण घर बसल्या व्हॉट्सअप, फेसबुक, इंस्टाग्रामवर आदी वर घेऊ शकतो. खूप सुंदर आरास, सजावट यामुळे हे सारं पाहून मन प्रसन्न होतं. आजकालची पिढी जुन्या पिढीपेक्षा खरंच भाग्यवान आहे, असे म्हंटले तर फारसे वावगे ठरू नये. कारण त्यांच्या नशिबाने बऱ्याच घरात सुबत्ता असल्याने सुंदर सजावटीसाठी सारा खर्च करणे सहज शक्य होतो आहे.


पण प्रत्येकाला असा खर्च करून सजावट करणे शक्य होत नाही, म्हणून प्रत्येक जण आपल्या आपल्या आर्थिक क्षमतेप्रमाणे खर्च करून सण साजरे करतात. श्रीमंती संबंधी माझी आजी मला म्हणत असे, कष्ट करावे, पैसा कमवावा, श्रीमंत व्हावे पण पाय जमिनीवर असावे, गर्व कधीच करू नये.

या संबंधात तिने मला एक गोष्ट सांगितली होती, ती अशी, ‘‘एकदा कुबेराला खुप ईच्छा झाली की आपले ऐश्वर्य, आपले वैभव, श्रीमंती श्री शंकराला दाखवावी. कुबेर लगेच श्री शंकराकडे गेले. शंकराला या गोष्टीची अंदाज आला होता की, कुबेर येथे का आले आहेत?

कुबेर शंकराला म्हणाले, देवा, माझे वैभव, संपन्नता, श्रीमंती पाहायला माझ्या राज्यात, माझ्या घरी यावे. मी माझे राज्य, घर खुप सुंदर आणि पाहण्यासारखे केले आहे सारे. माझ्याकडे प्रचंड संपत्ती आहे. शंकर हसले, आणि म्हणाले हे कुबेरा, हे सगळे पाहण्यात मला फारसे स्वारस्य नाही. त्या पेक्षा माझा पुत्र गणपतीला घेऊन जा. त्याला असे पाहायला खुप आवडते, तो आनंदाने येईन. त्याला सांगा सारे.

कुबेर गणपतीकडे आले आणि म्हणाले, हे गणेशा, माझे ऐश्वर्य, समृध्दी श्रीमंती पाहण्यास माझ्याकडे माझ्यासोबत चला. बालगणपती खुद्कन हसले आणि म्हणाले मी नक्की येतो, पण मला जे हवे ते तुम्ही पोटभर खायला देणार असाल तर?

कुबेर म्हणाले,अरे चला पटकन, माझ्याकडे काही कमी नाहीये. तुम्हाला, जे हवे ते खायला देतो पोटभर. आणि कुबेर आणि बाल गणपतीची स्वारी कुबेरा घरी दाखल झाली. तेथे आत अती सुंदर राजवाड्यात येताच गणपती म्हणाले, मला भूक लागली आहे. अगोदर खायला द्या. कुबेराने आपल्या मोठ्या पाकघरातून सारे अन्न, मागवले. गणपतीनी ते अगदी हसत, आनंदात सारे गट्टम केले.






कुबेर म्हणाले, चला गणपती महाराज आता हा राजवाडा पाहू या. गणपती म्हणाले, माझे अजुन पोट भरले नाही, तुम्हाला माहिती आहे, माझे नाव लंबोदर सुध्दा आहे. म्हणजेच माझे उदर हे लांब, मोठे प्रशस्त आहे, या राजवाड्यासारखे. मला अजून भूक आहे. अजुन काही तरी खायला द्या. आणि हो मला गोड खुप आवडते. मला काही मधुमेह नाही बरं का.

आणि मग कुबेरानी, मोदक, बुंदीचे लाडू, रव्याचे लाडू, शंकर पाळे, करंज्या, जिलेबी, गुलाबजाम, बासुंदी, श्रीखंड, आम्रखंड, आदी गोड पदार्थांच्या मोठ्या मोठ्या थाळ्या भरून मागविल्या. गणपतीने ते सारे ही पुन्हा गट्टम केले. कुबेरानी ते पुन्हा पुन्हा आचाऱ्या कडून करून घेतले पण गणपती महाराजानी सारे पुन्हा पुन्हा संपविले. आता मात्र आचारी ही थकले.

कुबेर खिन्न मनाने म्हणाले, हे गणेशा, आमच्या पाकघरातील सारे जिन्नस संपले आहेत. आचारी ही थकले आहेत आता तयार काही नाही. मग गणपती म्हणाले, मला सारे फळे ही आवडतात. कुबेरानी लगेचच, सफरचंद, आंबे, पेरू, केळी, चिकू, डाळींब, सीताफळ, रामफळ, फणस, द्राक्षे, बोरं, यांच्या भरगच्च डाली मागविल्या. त्याही फस्त केल्या. आता कुबेर हतबल झाले.ते म्हणाले हे गणेशा, आता खायचे सारे संपले आहे, गणपती म्हणाले, तुमचे कोठी घरात धान्य असेल ना? तेही मला चालेल. आणि कुबेर गणपतीला तिकडे नेताच गणपतीनी ते सारे धान्य खाऊन फस्त केले. आता कुबेर म्हणाले, आता पोट भरले असेल, चला आता माझ्याकडील वैभव दाखवीतो. तेंव्हा गणपती म्हणाले, नाही, मला अजुन भूक आहे.

आता मात्र कुबेर थबकले आणि म्हणाले, आता सध्या माझ्याकडे फक्त जड जवाहिरे, दाग दागिने, माणिक मोती आहेत. सोन्याची नाणी आहेत आणि वाडे आहेत. गणपती म्हणाले मला ते ही चालेल खायला. आणि हे ऐकताच कुबेर म्हणाले, चला महाराज. गणपतीने त्यांचे सारे जवाहिरे, दागिने, माणिक मोती आनंदात खाऊन टाकले.

आता मात्र कुबेर हिरमुसले आणि म्हणाले चला आपण नंतर बघू बाकी सगळं, परत जाऊ शंकर देवाकडे. इकडे परत येताच कुबेर म्हणाले,श्री शंकर देवा,आपल्या पुत्राने माझ्याकडे सारे वैभव पाहण्या ऐवजी माझे वैभव खाऊन टाकले आहे. आता माझ्याकडे काहीच शिल्लक नाही, श्रीमंती उरली नाही. ते पाहायला आले होते की खायला आले होते ? हेच मला समजले नाही. शंकर हसले आणि म्हणाले, हे कुबेरा तुमच्यातील हे माझे, ते माझे असे म्हणण्याचा स्वभाव गणेशाला पटला नसावा.

ही श्रीमंती, मोठेपणा जपून सांभाळावा लागतो. लक्ष्मी चंचल असते. गर्व झाला की तेथून पळ काढायला ही कमी करत नाही. जा गणेशा कडे, म्हणा त्याला हे माझे काही नाही, जे आहे ते सारे तुझे आहे. आणि कुबेरानी गणपतीकडे अशी प्रार्थना करताच गणपतीला त्यांची दया आली आणि त्यांनी, कुबेराचे सारे वैभव परत केले. ही कथा एकच सांगते की, येथे माझे काहीच नाही. जे आहे ते सारे ईश्वराचे आहे. त्यामुळे कुणालाच कधीच कसलाच गर्व होता कामा नये. आणि कुठल्याही देवाची पूजा, उत्सव, सण साजरे करताना अगदी साध्या पद्धतीने देवतांची मनोभावे पूजा केली तरी देव स्विकारतोच.

# चुकलेले अंदाज..

**ज्योतिर्मय साहित्य**

वेगवेगळे पदार्थ, स्वयंपाक करताना अनुभवाने आपल्याला तिखट, मीठ एकूण सगळ्याचाच अंदाज आलेला असतो पण मध्येच एखादेवेळी काही तरी गडबड होते आणि अंदाज चुकतो. हे चुकलेले अंदाज अनेक बाबतीत होतात.. शेतकऱ्याने लावलेला पिकाचा अंदाज, धान्याच्या दराचा अंदाज, परत वर्षातून एकदा सरकार बजेट ठरविते तेंव्हा तर अनेक अंदाज चुकलेले असतात.

आपल्या घरी एखादा समारंभ असतो. आपण अगत्याने आप्त, मित्रमंडळी यांना आमंत्रण देतो. कार्यालयात अगोदर जेवणाच्या पानांची संख्या सांगणे जरुरीचे असते. हे सर्वांना माहित असते. पण काहीजण आपण येऊ शकणार नाही हे कळविण्याची तसदी पण घेत नाहीत. किंवा तो कार्यक्रम झाल्यावर सुद्धा त्याबद्दल जुजबी चौकशी ही करत नाहीत.




माणसांच्या स्वभावाचा अंदाज तर कधीच लागत नाही. जी आपली, जवळची खात्रीची, विश्वासू वाटतात ती ऐनवेळी दगा देतात. या सगळ्या चुकलेल्या अंदाजाच्या डाव्या बाजू झाल्या.पण काही चुकलेले अंदाज आनंदाने आपली झोळी भरूनही टाकतात. उदाहरणार्थ. ज्या व्यक्तींच्या कडून अजिबात अपेक्षा केलेली नसते त्यांनी आपल्या पदार्थाचे, स्वभावातील एखाद्या गुणाचे, आपल्या दिसण्याचे अचानक सर्वांसमोर केलेले भरभरून कौतुक..


तसेच ज्या व्यक्ती आवर्जून आपल्या कार्याला येतील हे आपण गृहितच धरलेले नसते पण लांबचे अंतर पार करून अगत्याने त्यांनी लावलेली वर्णी आपल्या कार्याची शोभा वाढविते.. तसेच माणसांच्या स्वभावा बाबतीत आपल्याला त्यांच्या चांगुलपणाची कल्पना ही नसते, पण संकटाच्या ऐनवेळी ते धाऊन येतात आणि खंबीरपणे आपल्या पाठीशी उभे राहतात.



नुकत्याच सुरू झालेल्या श्रावणाच्या बाबतीत ही अंदाज चुकलेला आहे. अजून आषाढ धारा, कुंद आभाळ भरलेले आहे. पण प्रत्येकाच्या मनातला श्रावण मात्र दरवळतोय अगदी पारिजातक गंधासारखा.. मी आता त्याच्यावर रुसलीय हे त्याला समजेल का? अचानक माझा अंदाज चुकून सोनेरी ऊन पावसाच्या संगतीतले इंद्रधनुष्य निळ्याभोर आकाशात मला दिसेल का?..

# ऋणानुबंध....

**ज्योतिर्मय साहित्य**



लेकीच्या आणि आसपासच्या चार बिल्डिंगमध्ये साधारण यांच्याच आसपासच्या वयाच्या अनेक जोड्या राहत होत्या. कोल्हापूर, सांगली, सोलापूर, पुणे, नांदेड, लातूर इत्यादी सगळेच महाराष्ट्रीयन... त्यामुळे इकडच्या समान संस्कृतीची नाळ प्रत्येकाच्यातच खोलवर रुजलेली.. त्या सगळ्यांचेच एकमेकांशी असलेले मैत्र खूप सुंदर... घट्ट बंधांनी जोडलेले.

यांच्या पैकी एका जोडप्याला बाळ होणार होते.. नेमके त्या दोघांच्या आई बाबांना व्हिसा मिळाला नाही आणि ते येऊ शकले नाहीत. इथे दवाखान्यात बाळाच्या आईला फक्त एक दिवस ठेऊन घेतात.. तिचे सिझेरीयन होऊनही तिला दुसऱ्या दिवशी घरी पाठविले... त्यावेळी या सगळ्या मित्र मंडळींनी त्यांच्यासाठी करता येईल तितके केले. आम्हीं गेलो त्यावेळी त्या गोड मुलीचा पहिला वाढदिवस होता, आमचा सहभाग होताच आणि तिचेही आजी आजोबाही भारतातून आले होते... यांच्यापैकी कोणाचाही कार्यक्रम हे एकत्रित छान साजरा करतात. त्यामुळे आनंद वाढतो.




या मुलांच्या पैकी कोणाचेही पालक आले तरी ही सगळीच जण खूप प्रेम आणि आदराने त्यांच्याशी वागतात.. या वेळी आम्हीं दोघे होतो. स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रमाच्या वेळी थोडी ओळख झालीच होती... नंतर प्रत्येक जोडप्याने अगत्याने आम्हाला घरी जेवायला बोलावले.. काही सहली आमच्या थोड्या मित्र मंडळी समवेत झाल्या. गणपतीच्या वेळी लेकीकडे पाचही दिवस वेगवेगळ्या २०/२५ लोकांना आरतीसाठी बोलावले होते... तशीच रोज आम्हालाही आमंत्रणे असायची. काहींनी बाहेरून तर काहींनी घरी गणपती बनविला होता . त्याची साग्र संगीत पूजा, आरती ही मुले मनापासून करत होती. या दिवसात माझेही या सगळ्याच मुलांशी मैत्र निर्माण झाले. एकत्र जमल्यावर होणाऱ्या संवादातून त्यांची मानसिकता, मते कळत होती... मलाही त्यांच्याकडून खूप काही नवीन बाजू समजत होत्या, विचाराच्या देवाण घेवाणातून अनेक माहीत नसलेले पैलू कळत होते... शिकायला मिळतं होते.

इथे खूप जण मध्यमवर्गीय घरातून आलेले.. स्वतःच्या बुद्धिमत्तेने संधी मिळाली आहे तर स्वतः साठी आणि आपल्या कुटुंबासाठीही काय केल्याने आनंद मिळेल याचा विचार करणारे. काही जण सुस्थितीतले पण वेगळे जग, वेगळा अनुभव आणि इथल्या समृद्ध, शांत,समंजस जीवन शैली आवडत असल्याने इथे राहण्याचा विचारात असलेले. या सगळ्या मुलांना आपला देश, आपले कुटुंबीय यांची वाटणारी कातर ओढ त्यांच्या शब्दातून जाणवायची. त्यांच्यासाठी ही हे खूप अवघड आहे की आपला देश, आणि आपली माणसे, संस्कृती सगळे सोडून दूर जाणे.. उलट त्याची जाणीव असल्याने संस्कृती ची मुळे आपल्या परंपरा जपत ते ती आपल्या मुलांच्यातही ते ती रुजावी म्हणून प्रयत्न करत होते. यातील बहुतेक जणांनी थोड्या वर्षात परत भारतात येणार असे मला सांगितले.

हादगा (भोंडला) गरबा हा नवरात्री मध्ये इथे कम्युनिटी हॉल मध्ये एकत्र केला.. त्यावेळी सगळ्यांचे एकत्र येणे, सगळ्यांचा उत्साही सहभाग खूप बघण्यासारखा होता. देवीची पूजा, आरती त्या सगळ्यांच्यात मी मोठी होते म्हणून माझ्या हातून केली त्यावेळी मला अगदी भरून आले. आम्हां दोघांना नेहमीच ही मुले खूप आदराने नमस्कार करतं. आमच्या लेक जावया इतकेच सगळ्यांचे आमच्याकडे लक्ष असे. कुठेही गेलो तरी आम्हां दोघांची काळजी सहजपणे ही सगळी जण घेत असतं.

एकत्रित कार्यक्रम किंवा कधीतरी विचारत तफावत येतेच पण ती तात्पुरती ठेऊन कुठेही न ताणता यांचे परत एकत्र आलेले बघता यांच्या सगळ्यांच्याच सामंजस्य स्वभावाचे कौतुक वाटे

हे सगळे आसपास राहतात.. पण भारतातील तामिनाडूमधील रेश्मा मितु ची डान्स पार्टनर एकटी कॅनडात राहते.. नोकरी बरोबर किती तरी क्षेत्रात ही मुलगी छान सहभाग घेते.. तसेच अंकुर, प्राची या दोघांचे घर ही दूर आहे. पण त्या पूर्ण कुटुंबाची आमच्याशी छान मैत्री झाली आहे. प्राची आणि मिताली दोघींच्या आवडी, सामाजिक भान, प्लास्टिक विरोध, अशा अनेक गोष्टी समान आहेत.. त्या दोघी कुठल्याही विषयावरचा मनात आलेले विचारांचा एकमेकीला ऑडिओ टाकतात..किती सुंदर सामंजस्य आहे हे.

तसेच सर्वेशच्या ऑफिसमधील काही जण, मितालीच्या झुंबा, फूड ब्लॉग मुळे झालेले मित्र मैत्रिणी असे खूप जणांशी आमची ओळख झाली. जी कायम स्मरणात आणि आयुष्यात ही राहील.. कारण हे बंध त्यांनी मनापासून जोडले आहेत.

सहजीवन म्हणजे काय असते हे या जोडप्यांच्या कडे बघून खरे कळले. प्रत्येक काम, आनंद, प्रवास, सगळे मिळून एकमेकांच्या विचारांनी करणारी ही मुले बघून खूप छान वाटले.या प्रत्येकाच्या घरी जाताना, येताना दोन्हीं वेळेला आम्हाला जेवायला बोलाविले.. त्यांच्या प्रेमाने आम्ही अगदी भाराऊन गेलो. या प्रत्येक व्यक्तीशी आमचे वेगळे प्रेमाचे बंध आणि न विसरणाऱ्या आठवणी निर्माण झाल्या आहेत.. ज्या कायमच दृढ राहतील.

माझी मुलगी जावई इतके दूर म्हणून आम्हांला नेहमी काळजी वाटत असे... पण या सगळ्यांच्या भेटी नंतर ते किती सुरक्षित आहेत आणि कुठल्याही त्यांच्या चांगल्या, वाईट प्रसंगी धाऊन येणाऱ्या त्यांच्या या सगळ्या सहकाऱ्यांचे प्रेम आणि मैत्र बघितल्यावर आम्ही निर्धास्त झालो.

या सगळ्यांचा निरोप घेताना अगदी मन भरून आले... दैवाने आम्हा दोघांना वेगळ्या देशात इतके सगळे प्रेमळ ऋणानुबंध दिले त्यासाठी स्वतःला भाग्यवान समजते.

# दूधसागर धबधबा खरंच अविस्मरणीय....

**ज्योतिर्मय साहित्य**

२०१३ साली ‘चेन्नई एक्स्प्रेस’ हा हिंदी चित्रपट प्रदर्शित झाला. रोहीत शेट्टीने दिग्दर्शित केलेल्या या चित्रपटात आघाडीचे नट शारूख खान आणि नटी दिपीका पदुकोन यांनी काम केले होते. २०१३ साली हाऊसफुल्ल ठरलेला हा चित्रपट आताशः कुणाला आठवतही नसले. पण, त्या चित्रपटातील एका दृष्याने मात्र गोवा राज्याच्या हद्दीतील दूधसागर धबधबा मात्र अविस्मरणीय ठरविला. त्यामुळे पूर्वी खानापूर, जोयडा तालुक्यातील पर्यटकांचे आकर्षण असलेल्या दूधसागर धबधब्याला पर्यटकांचे लोंढे वाढले. आता तर दूधसागर हे पर्यटकांचे माहेरघर बनले आहे.

महाराष्ट्रातील पर्यटकांना साताऱ्यातील डॉ. मृणालिनी गायकवाड-कोळेकर या दूधसागरचे दर्शन घडवित आहेत.

डॉ. मृणालिनी या ब्युटी अँड वेलनेस क्षेत्रात व्यावसायिक असून हौसी ट्रेक ऑर्गनायझर आहेत. त्यांनी वयाच्या चाळीशीनंतर अनेक दऱ्या-खोऱ्यात ट्रेक मोहीमां, सह्याद्रीच्या कुशीत गड किल्ले केले आहे. क्लाइंबिंग,रॅपलिंग, रेंज ट्रेक, तसेच काही नाईट ट्रेक केले आहेत, त्यांनी सह्याद्रीच्या दऱ्या-खोऱ्याबरोबरच हिमालयातही सात ट्रेक यशस्वी केले आहेत. त्यांनी या ट्रेकींगच्या वेडापायी महाराष्ट्रातील पर्यटकांना दूधसागरची सफर घडविली आहे. आतापर्यंत त्यांनी साताऱ्यातील अनेक वयोगटातील लोकांना दूधसागर ट्रेकींगचा आनंद मिळवून दिला आहे. विशेष म्हणजे डॉ. मृणालिनी या वनखात्याच्या नियमावलींचे पालन करीत या मोहीमांचे आयोजन करतात. गोव्यातून सुरूवात होणाऱ्या या ट्रेकींगमध्ये कांही वनाधिकारी आणि कर्मचारीही त्यांच्यासमवेत मार्गदर्शनासाठी असतात. यादरम्यानच्या काळात जंगलात घ्यावयाची काळजी, प्रदूषण टाळण्यासंबंधी त्या कटाक्षाने लक्ष देतात. त्यामुळे त्यांच्या ट्रेक मोहिमेत विविध वयोगटातील पर्यटक आनंदाने सहभागी होतात. साताराहून येणाऱ्या या दूधसागरचे ट्रेकींग मध्ये मुंबईपासून काहीजण सहभागी होत आहेत .



मुंबईतील ट्रेकर्स सुध्दा डॉ. मृणालिनी यांच्या मोहीमात सहभागी होतात. आत्तापर्यंत त्यांनी गेल्या चार वर्षात साताऱ्यातील व सातारा बाहेरील असे ११७ हून अधिक ट्रेकर्सना सोबत घेऊन दूधसागरच्या विहंगम नजाऱ्याचे दर्शन घडविले आहे, या सगळ्यांमध्ये गोवा राज्यातील मोलेम गावातील हॉटेल रोशनचे संचालक दत्तराज खांडेपार आणि त्याचे सहकारी गोपीनाथ उसपकर तसेच वनाधिकारी सिद्धेश नाईक यांचा सहभाग होता.

एकंदरच दूधसागरच्या मनमोहक निसर्ग सौंदर्याने भूरळ महाराष्ट्रातील अनेकांना घातली आहे. त्यात डॉ. मृणालिनी यांनी चालविलेल्या ट्रेक मोहिमांचा फायदा पर्यटकांना होत आहे.

स्वतः मृणालिनी यांनी ४० वर्षानंतर त्यांचा मुलगा वेदांत याच्या हट्टा पायी ट्रेकिंग सुरू केले असून, आज त्या अनेक महिलांना तरुण पिढीला तसेच ज्येष्ठ नागरिकांना ट्रेकिंग साठी प्रोत्साहित करीत आहेत.

यावर्षी दूध सागरला एकूण बऱ्याच जणांना त्या घेऊन गेल्या होत्या त्यापैकी १६ जणींचा फक्त महिलांचा ग्रुप होता, त्यामध्ये बारा वर्षाच्या मुली ते ६२ वर्षांच्या महिलां ही होत्या. तसेच शारीरिक कमतरता असणाऱ्या महिलाही होत्या, पण मृणालिनी यांनी सांगितलेल्या सूचना ऐकत या सर्वजणींनी दूध सागर चा २८ किलोमीटरचा जंगलातील ट्रेक अतिशय यशस्वीरित्या पार पाडला. आजपर्यंत दूध सागरला पुणे मुंबई बेंगलोर हून ट्रेकिंगला नेणाऱ्या ग्रुप ऑर्गनायझिंग ट्रेकर्स मध्ये मृणालिनी या पहिल्या महिला दूध सागर ट्रेक ऑर्गनायझर ठरले आहेत अशी माहिती दूध सागर जंगल वनाधिकाऱ्यांनी दिली.



डॉ. मृणालिनी गायकवाड-कोळेकर
9130015122




हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559